द्रावणातून पहील्यांदा २० लिटर द्रावण शिल्लक ठेवून त्यात २ किलो गुळ व १८० लिटर पाणी टाकून वरील प्रमाणेच कृती करावी. ५ ते ७ दिवसात तेवढ्याच उपयुक्ततेचे द्रावण तयार होईल. किंवा तयार झालेल्या द्रावणातून नवीन २०० लिटर क्षमतेच्या ५ ड्रम मध्ये प्रत्येकी २० लिटर द्रावण, २ किलो गुळ व १८० लिटर पाणी टाकून पुढील ५-७ दिवसात आपणास १००० लिटर द्रावण तयार होऊ शकते. असे आपण वर्षानुवर्षेतयार करू शकतो.

## शेणखत कुजवण्यासाठी व कंपोस्ट बनविण्यासाठी :

पिकास आपल्या वाढीदरम्यान मुख्य, दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची नितांत गरज भासते. यापैकी कुठल्याही घटकाची कमतरता झाल्यास पिकाच्या वाढीवर व परिणामता उत्पादनावर परिणाम होतो. हे घटक पुरविण्यासाठी विक्रेते महागड्या निविष्ठांची व खतांची शिफारस करतात. आपल्या दैनंदिन वापराच्या अनेक साधनांद्वारे यातील बरेच घटक आपणाला पिकास उपलब्ध करून देता येतात. ही साधने अल्पखर्चिक असण्या सोबतच आपण स्वत: यापासून निविष्ठा तयार केल्यामुळे ही विश्वासाई देखील असतात. नॅशनल सेंटर ऑफ ऑर्गेनिक फार्मिंग , गाजियाबाद या संस्थेद्वारा संशोधीत वेस्ट डिकंपोजरच्या सहाय्याने अश्या सहज उपलब्ध साधनांन पासून उत्तम प्रकारचे अन्नद्रव्ये पिकास पुरविता येतात. वेस्ट डिकंपोजर हे उत्तम द्रावक असल्यामुळे या साहित्यातील अन्नद्रव्ये व इतर हार्मोन्स अत्यंत प्रभावीरीत्या त्यात सुक्ष्मअन्नद्रव्ये विरघळवून फवारणीद्वारे किंवा जमिनीच्या माध्यमातून वापरल्यास पिकास तुलनेने लवकर प्राप्त होतात.

## डीकंपोजर तयार करण्याची पध्दत

२ किलो गुळ २०० लिटर पाण्यात ड्रममध्ये टाकून पूर्ण मिसळावा

↓

वेस्ट डीकंपोजरची बाटली उघडून त्यातील जीवाणू संवर्धक ड्रम मधील पाण्यात पुर्णपणे मिसळावे

↓

दिवसातून एक वेळेस ढवळावे

↓

ड्रम हा कापडाणे किंवा झाकणाने झाकावा


↓

सात दिवसामध्ये वेस्ट डीकंपोजर वापरण्यास तयार होते.





## डीकंपोजर वापराच्या पध्दती




संदर्भ : नॅशनल सेंटर ऑफ ऑर्गेनिक फार्मिंग , गाजियाबाद

प्रकाशक

**कृषि विज्ञान केंद्र**

मराठवाडा शेती सहाय्य मंडळ, जालना

फोन नंबर : ०२४८२ - २३५५८६, २३८२६६, २३७३२६

Email : pckvkjalna@gmail.com

प्रति १०००

प्रकाशन क्रमांक : ०४/२०२२

आज़ादी का अमृत महोत्सव

# वेस्ट डीकंपोजर वापर व महत्व

राहुल चौधरी

श्रीकृष्ण सोनुने




भाकृअनुप ICAR

**कृषि विज्ञान केंद्र**

मराठवाडा शेती सहाय्य मंडळ, खरपुडी, जालना

# वेस्ट डीकंपोजर वापर व महत्व

**एक बाटली पासून ३० दिवसात**
**१ लाख मेट्रिक टन कचरा कुजवू शकते**

कंपोस्ट हे एक प्रकारचे खत आहे जे सेंद्रिय पदार्थांचे विघटन आणि पुनर्वापरातून मिळते. हा शेतीचा मुख्य घटक आहे. कंपोस्ट बनवण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे ओलसर सेंद्रिय पदार्थाचा ढीग (जसे की पाने, उरलेले अन्न इ.) तयार करणे आणि ते कुजण्यासाठी काही काळ प्रतीक्षा करणे. याचे विघटन होण्यास काही आठवडे किंवा महिने लागतात, त्यानंतर त्याचे रूपांतर ह्युमस मध्ये होते.

कंपोस्टिंगची आधुनिक पध्दत अनेक टप्प्यांत पूर्ण केली जाते आणि प्रत्येक टप्प्यात पाणी, हवा आणि कार्बन आणि नायट्रोजन याचे मोजमाप केले जाते. सद्य परिस्थितीत शेणखताची कमतरता जाणवत असून त्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून जमिनीतील जीवाणूंचे प्रमाण विविध पर्यायांनी वाढविणे गरजेचे आहे.

ज्या शेतकऱ्यांनी मजुरांची समस्या, पैशांची कमतरता अथवा इतर सुविधेअभावी जनावरे पाळणे शक्य नाही व त्यामुळे नैसर्गिक शेतीसाठी जनावरांचे शेण व मूत्र उपलब्ध नाही अशा शेतकऱ्यांसाठी वेस्ट डिकंपोझर हा एक अत्यंत उपयुक्त पर्याय आहे.

## साहित्य :

वेस्ट डिकंपोझर, २ किलो गुळ २०० लिटर क्षमेताचा प्लास्टिक ड्रम किंवा मातीचा रांजण (कोणत्याही धातूचा अजिबात नको) २०० लिटर पाणी (विहिरीचे, बोअरचे अथवा नळाचे यापैकी कुठलेही चालेल)

## कसे बनवावे :

ड्रममध्ये २०० लिटर पाणी टाकावे. त्यात बाटलीतील वेस्ट डिकंपोझर व २ किलो गुळ टाकून लाकडी काठीने २ ते ५ मिनिट ढवळावे, त्यानंतर हे द्रावण स्वच्छ कापड अथवा बारदान्याने झाकावे. स्थानिय वातावरण व तापमानानुसार हे द्रावण तयार होण्यास ५ ते ७ दिवसाचा अवधी गरजेचा आहे. यादरम्यान दररोज दोनदा हे द्रावण लाकडी काठीने २ ते ५ मिनिटे ढवळावे. द्रावण बनवताना ड्रम सावलीत किंवा उघड्यावर ठेवावे अशी कोणतीही अट नाही.

पहिल्या दिवशी द्रावणाचा रंग त्यातील गुळामुळे काहीसा तांबूस दिसेल. तीन दिवसानंतर हा रंग काहीसा दुधाळ दिसू लागेल. ५ व्या किंवा ७ व्या दिवशी द्रावणाचा रंग पूर्णपणे दुधाळ दिसू लागेल. याचा अर्थ कल्चरमधील जीवाणू व एंझाइम्स द्रावणात पूर्णपणे विकसीत झाले आहेत व द्रावण वापरण्यासाठी तयार आहे. हेच द्रावण विरजण म्हणून २० लिटर एका ड्रमध्ये टाकून त्यात २०० लिटर पाणी व २ किलो गुळ टाकुन वरील प्रमाणे ५-७ दिवसात पुन्हा तयार करावे. अशा प्रकारे लाखो लिटर द्रावण तयार करता येते.

## कसे वापरावे :

जमीनीमधे तयार झालेले २०० लिटर द्रावण १ एकरास ठिबकद्वारे अथवा पाटपाण्याने द्यावे. यामुळे जमीनीत सूक्ष्मजीवाणू व गांडूळाची वाढ होऊन जमिन सुपिक व भुसभुशित बनते. जमीनीतील सेंद्रीय पदार्थाचे अतीशीघ्र विघटन होऊन त्यांचे अन्नद्राव्यात रूपांतर होते. ही अन्नद्राव्ये पिकाच्या मुळांना सहज ग्रहण करता येतात. परीणामी पिकांची वाढ जोमाने होते.

## बिजप्रक्रिया :

पिकांवर फवारणीसाठी १ लिटर पाण्यात ३०० मिली. या प्रमाणात वेस्ट डिकंपोझर द्रावण मिसळून दर ८ ते १५ दिवसांनी फवारल्यास हानीकारक बुरशी व कीड यांचा उपद्रव होत नाही. या प्रमाणानुसार फवारणीच्या १५ लिटर क्षमतेच्या पंपात ४ ते ४.५ लिटर द्रावण मिसळावे. आपल्या परिसरात होणाऱ्या प्रादुर्भावाच्या तीव्रतेनुसार फवारणीचा काळ आपण ठरवावा.

## फवारणी :

१ लिटर पाण्यात ३०० मिली. या प्रमाणात वेस्ट डिकंपोझर द्रावण मिसळून पेरणी आधी बियाण्यांवर शिंपडावे व अर्धा तास सावलीत वाळवून पेरणी अथवा टोकण करावी. रोप लावणी अगोदर त्यांची मुळे या द्रावणात बुडवून लागण करावी. यामुळे बियाण्याचे व मुळांचे जमीनीतील हानीकारक बुरशी व जिवाणू यांचे पासून संरक्षण मिळते.

अंदाजे १ टन शेणखताच्या ढिगावर केवळ २० लिटर वेस्ट डिकंपोझर द्रावण शिंपडावे. एक आठवड्यानंतर हा ढिग पलटावा व त्यावर पुन: २० लिटर द्रावण शिंपडावे असे दर आठवड्याला करत ४० दिवसात उत्तम प्रतीचे कुजलेले शेणखत तयार होते ज्यामध्ये उपयुक्त सूक्ष्म जीवाणूंची संख्या अधिक आहे. शेणाऐवजी आपल्याकडील जमा केलेला काडीकचरा किंवा धान्य मळणीनंतर निघालेला कोणत्याही पिकाचा भुसा यावरही अशीच प्रक्रिया करून उत्तम प्रकारचे कंपोस्ट खत तयार करता येते.

एकदा तयार झालेल्या द्रावणापासून आपण पुन्हा पुन्हा नवीन द्रावण तयार करू शकता. यासाठी तयारर